दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी... epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४०७ वा • बुधवार, ता.१७ सप्टेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लांबणीवर; ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

## सर्वोच न्यायालयाचे निवडणूक आयोग व राज्य सरकारच्या हलगर्जीपणावर बोट

**नवी दिल्ली । रयत समाचार** महाराष्ट्रातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी जानेवारी २०२६ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी करणारा अर्ज राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात सादर केला होता. त्यावर मंगळवारी (१६ सप्टेंबर) सुनावणी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने राज्य राज्य निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. निवडणूक आयोगाला आता ३१ जानेवारीपर्यंत या निवडणुका घ्याव्या लागतील. सर्वोच्च न्यायालयात आज महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांप्रकरणी सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाकडून निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदवाढ मिळाली आहे. यामुळे निवडणूक आयोगासह राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे. ही मुदतवाढ मिळावी यासाठी आयोगाने कर्मचाऱ्यांची कमतरता, ईव्हीएमचा मुद्दा, सणसमारंभासह वेगवेगळी कारणं दिली होती. न्यायालयाने आयोगाचे मुद्दे लक्षात घेत त्यांना निवडणुका घेण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेली चार-पाच वर्षे ओबीसी आरक्षणासह विविध कारणांमुळे लांबणीवर पडल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाने अखेरीस याप्रकरणी मे महिन्यात झालेल्या सुनावणीवेळी निवडणुकांना दिलेली स्थगिती उठविली आणि चार महिन्यांत म्हणजेच ऑक्टोबर २०२६ पर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले होते. त्यानुसार आयोगाने प्रभागांची पुनर्रचना, आरक्षणे, मतदारयाद्या अद्यायावत करणे, आदी प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र, कर्मचाऱ्यांच्या कमतरतेसह इतर काही कारणे पुढे करत निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी मुदतवाढ मागितली होती. न्यायालयाने ही मागणी मान्य केली आहे. सर्वोच न्यायालयाचं निवडणूक आयोग व राज्य सरकार्चा हलगर्जीपणावर बोट दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने मुदतवाढ देताना स्पष्ट केलं आहे की ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व प्रकारच्या निवडणुका पार पडल्या पाहिजेत. तसेच राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या ज्या मागण्या असतील त्यासंदर्भात राज्य सरकारकडे पाठपुरावा करावा असं सांगितलं आहे. सर्वोच्च न्यायालयाने आयोगाला सांगितलं आहे की ईव्हीएमची मागणी, कर्मचाऱ्यांची मागणी यासंदर्भात राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवा. सर्व मागण्या कशा पूर्ण करता येतील, कामाचे टप्पे कसे असतील यासंदर्भात न्यायालयाने आयोगाला वेळापत्रक दिलं आहे. ''मागील सुनावणीवेळी चार महिन्यात निवडणुका घेऊ म्हणणाऱ्या निडणूक आयोगाचा हलगर्दीपणा झाल्याचं दिसत आहे'', अशी टिप्पणी देखील न्यायालयाने यावेळी केली.

## समूहस्पर्धेत बलराम शाळेचे घवघवीत यश



**काणकोण । रयत समाचार** खोतीगांव शाळा समूहाने जुलै महिन्यात आयोजित केलेल्या विविध शालेय स्पर्धांमध्ये श्री बलराम प्राथमिक अवे शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले. या यशामुळे शाळेचे नाव उंचावले असून शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांमध्ये विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे. स्पर्धांतील निकाल पुढीलप्रमाणे आहेत. चित्रवर्णन स्पर्धा (इयत्ता ४ थी) मध्ये क्रीयांश कृष्णा वेळीप याने प्रथम क्रमांक पटकावला. बडबडगीत स्पर्धा (इयत्ता १ ली) मध्ये यादवी उल्हास वेळीप हिने द्वितीय क्रमांक मिळवून शाळेचा मान वाढविला. इंग्रजी शब्द रचना स्पर्धा (इयत्ता २ री) मध्ये नैवेध्या दत्ता वेळीप याने प्रथम क्रमांक मिळवला, तर इंग्रजी वाचन स्पर्धा (इयत्ता ३ री) मध्ये शौर्य जानू तवडकर याने द्वितीय क्रमांक पटकावला. या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग तसेच पालकांनी मनःपूर्वक अभिनंदन केले असून, भविष्यात आणखी उंच भरारी घेण्याच्या शुभेच्छा दिल्या.

## पंजाब सरकारच्या धर्तीवर तातडीने नुकसान भरपाई जाहीर करा : खाकाळ

### हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्या आम आदमी पार्टी

**अहमदनगर । रयत समाचार** संपूर्ण महाराष्ट्रात अतिवृष्टी सुरू झाल्यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विदर्भातील सोयाबीन पाण्याखाली गेले असून कापूस पीक अडचणीत आले आहे. संत्रा व मोसंबी गळू लागले आहेत, तर कांदा पीकही मोठ्या प्रमाणावर खराब होणार असल्याचे दिसत आहे. पुण्यातील जवळपास ५५ महसूल मंडळे तसेच सोलापूर, बीड, भंडारा आणि अहिल्यानगर जिल्ह्यांना सर्वाधिक फटका बसला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना तातडीने मदतीचा हात देणे आवश्यक असल्याचे आम आदमी पार्टीचे भरत श्रीराम खाकाळ यांनी म्हटले आहे. खाकाळ म्हणाले की, ''निवडणुकीपूर्वी कर्जमाफीचे आश्वासन महायुती सरकारने दिले होते. मात्र, त्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार गप्प बसले आहेत. दुसरीकडे, पंजाबमध्ये पूरस्थितीत आम आदमी पार्टीच्या भगवंत मान सरकारने शेतकऱ्यांना तब्बल ५० हजार रुपये हेक्टरी नुकसान भरपाई दिली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही तातडीने हीच मदत जाहीर करावी.'' महाराष्ट्र शासनाच्या ३० मे २०२५ च्या आदेशानुसार सध्या केवळ दोन हेक्टर शेतीसाठीच नुकसान भरपाई दिली जात आहे. त्यात कोरडवाहू क्षेत्रासाठी ८५०० रुपये प्रति हेक्टर आणि बागायती क्षेत्रासाठी १७ हजार रुपये प्रति हेक्टर इतकीच रक्कम जाहीर आहे. ही मदत अत्यल्प असून शेतकरी उभा राहणे अशक्य असल्याचे खाकाळ यांनी सांगितले. दररोज महाराष्ट्रात आठ शेतकरी आत्महत्या करत असल्याची स्थिती आहे. याशिवाय, मोदी सरकारने अमेरिकेतून येणाऱ्या कपाशीवरील ११% आयात कर काढून टाकल्याने ऑक्टोबरमध्ये शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा साधारण दीड हजार रुपये कमी मिळण्याची शक्यता आहे. ''या सर्व परिस्थितीचा विचार करून तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना ५० हजार रुपये हेक्टरी मदत द्यावी. अन्यथा आम आदमी पार्टी मोठे आंदोलन छेडेल,'' असा इशारा खाकाळ यांनी दिला.

# हसत हसत धाक ठेवणारे संचालक सीएसआरडीला लाभले- निवृत्त समाजकल्याण अधिकारी मुन्शी




**अहिल्यानगर । प्रतिनिधी** भास्कर पांडुरंग हिवाळे संस्थेच्या सीएसआरडी कॉलेजमध्ये प्रथम वर्षाच्या एमएसडब्ल्यू समाजसेवा आणि बीजेएमसी पत्रकारीता विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिलेल्या माजी समाजकल्याण अधिकारी रफिक मुंशी यांनी आपल्या अनुभवातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी दिशा दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी सीएसआरडीचे 'ग्रामीणविकास' हे गाणे सादर करून वातावरण भारावून टाकले. मरयम सय्यद हिने प्रमुख अतिथींची ओळख करून दिली व त्यांच्या उपस्थितीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. मुख्य वक्ते रफिक मुंशी, जे या कॉलेजच्या पहिल्या बॅचचे विद्यार्थी आहेत, यांनी आपल्या प्रवासातील किस्से सांगत विद्यार्थ्यांना धाडस, संयम आणि स्टेज डेअरिंग वाढवण्याचे महत्त्व पटवून दिले. '' र्छों ींहळपसी लीीं ाशप ही संस्थापक भास्कर पांडुरंग हिवाळे यांची शिकवण माझ्या जीवनाचा आधार ठरली,'' असे ते म्हणाले. आज सीएसआरडीमध्ये खमका प्राचार्य आहे. ते समर्थपणे संस्था सांभाळत आहेत. हसता हसता धाक ठेवणारा संचालक तुम्हाला लाभला आहे. असे मत त्यांनी प्राचार्यांविषयी मांडले. यावेळी जयश कांबळे यांनी मराठी माध्यमातून घडवलेला आपला प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला. ''एमएसडब्ल्यू कोर्समुळे देश-विदेशात अनुभव घेण्याची संधी मिळाली. संयम आणि चिकाटीने ध्येय निश्चित करा,'' असा संदेश त्यांनी दिला. शुभम गायकवाड यांनी अनुभव कथनासोबतच प्रेरणादायी कविता सादर केली. लोळगे मॅडम यांनी सीएसआरडीमध्ये प्रवेश हा अभिमानाचा विषय असल्याचे सांगत संधी कधीही न गमवण्याचे आवाहन केले. के. के. कानोजिया एमएसडब्ल्यू समाजसेवा आणि बीजेएमसी पत्रकारीता कोर्स विद्यार्थ्यांना मॅच्युरिटी, धाडस व जगाशी सामना करण्याची तयारी घडवतो, असे प्रतिपादन केले. पी. एस. पाटील यांनी सीएसआरडी ब्रँड, मल्टीटास्किंग कौशल्ये आणि त्यांची आयुष्यातील उपयुक्तता अधोरेखित केली. प्राचार्य पठारे सरांनी नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करत कॉलेजचा इतिहास, माजी विद्यार्थ्यांचे योगदान तसेच नवीन बॅचसाठी लोगो, टॅगलाइन, ऑनलाइन शिक्षण, क्रेडिट बँक योजना व फेलोशिपची माहिती दिली.फॉर्मल कार्यक्रमानंतर सांस्कृतिक सादरीकरणांनी रंगत वाढवली. ओम आणि शिवानी भगवाने यांनी कल्चरल कार्यक्रमाची सुरुवात केली. यामध्ये विद्यार्थ्यांनी हिंदी गाणी, ट्रेडिशनल डान्स तसेच बंजारा संस्कृतीवर आधारित नृत्य सादर केले. या वेलकम प्रोग्राममुळे नवीन विद्यार्थ्यांना माजी विद्यार्थ्यांच्या प्रवासातून प्रेरणा घेण्याची संधी मिळाली आणि शैक्षणिक व वैयक्तिक विकासासाठी नवे ध्येय निश्चित करण्याचा मार्ग खुला झाला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैष्णवी दिवटे आणि सागर टिके यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिवानी शिंगवी यांनी केले.

## प्रजापिता ब्रह्माकुमारी यांचा अभियंता दिन साजरा



**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**
प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, बेळगाव सिटी सेंटरच्या वतीने रविवारी काळी आमराई येथे अभियंता दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात बेळगावमधील विविध सरकारी तसेच खाजगी क्षेत्रातील अभियंत्यांचा सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्षत्व ब्राह्माकुमारी अंबिका बहनजी, सब झोनल इन्चार्ज यांनी केले. यावेळी गंगाधर अळगुंडी (डीसीई एईई), बी.एस. इंचनाळ (अशोक आयर्न वर्क्स उपव्यवस्थापक), मंजुळा कुदराळ (पोलीस हाऊसिंग कार्पोरेशन बेळगाव कार्यकारी अभियंता), अश्विन शिंदे (हेस्कॉम सहाय्यक कार्यकारी अभियंता) यांसह एकूण २८ अभियंत्यांचा शाल, पुष्प आणि भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. ब्राह्माकुमारी अंबिका बहनजी यांनी सांगितले, प्रजापिता ब्रह्माकुमारी वतीने विश्वशांतीचे कार्य अखंडित सुरू असून, यासाठी सर्व क्षेत्रातील लोकांचे सहकार्य अनमोल आहे. कार्यक्रमाची सुरुवात ब्राह्माकुमारी संपत्ती, ब्राह्माकुमारी सुकन्या, ब्राह्माकुमारी मोहिनी यांनी तिलक लावून आणि पुष्प देऊन उपस्थित अभियंत्यांचे स्वागत केले. ब्राह्माकुमारी साधना यांनी विश्वविद्यालयाच्या कार्याची माहिती दिली तसेच उपस्थितांना ध्यानाचे धडे दिले. पौर्णिमा पाटील यांनी अभियंता दिनाचे महत्त्व स्पष्ट केले, तर डॉ. कौमुदी पाटील यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार व्यक्त केले.




## जनगणना सर्वेक्षणात आधी 'हिंदू मराठा', नंतर पोटजात नमूद करा- मुळे

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**
बसवकल्याणचे माजी आमदार व मराठा समाजाचे नेते एम.जी. मुळे यांनी जनगणना सर्वेक्षणाच्या वेळी जात नोंदवताना प्रथम 'हिंदू मराठा' आणि त्यानंतर पोटजातीचा उल्लेख करण्याचे आवाहन केले.

बेळगाव येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितले की, राज्य सरकार जातीनिहाय जनगणना करत आहे. या सर्वेक्षणाच्या फॉर्ममध्ये धर्म हिंदू, जात मराठा, पोटजात कुणबी, मातृभाषा मराठी असा तपशील भरावा, असा निर्णय ११ सप्टेंबर रोजी मराठा समाजाच्या विस्तृत बैठकीत घेण्यात आला आहे.

मुळे यांनी स्पष्ट केले की, मराठा समाज प्रामुख्याने शेतकरी व मध्यमवर्गीय असून, पोटजातींची आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक पार्श्वभूमी वेगळी असली तरी जात रकान्यात नेहमी 'हिंदू मराठा' असे लिहावे आणि त्यानंतर पोटजातीची नोंद करावी. या निर्णयाची माहिती घरोघरी जाऊन जनजागृती केली जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

या पत्रकार परिषदेला खानापूरचे आमदार विठ्ठल हलगेकर, सकल मराठा समाजाचे नेते किरण जाधव, तसेच क्षत्रिय मराठा नेते अॅड. अनिल बेनके उपस्थित होते.

## चांगली सेवा, विश्वास हे सर्वांगीण प्रगतीचे ध्येय- राहुल महालंक




**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**
बांधकाम क्षेत्र हा समाजाचा पाया असून, याकडे लक्ष देऊन प्रत्येकाने काम करावे, असे प्रतिपादन ब्ल्यू स्मार्ट एलिव्हेटरचे संचालक राहुल महालंक यांनी केले. त्यांनी सांगितले की, लोकांना चांगली सेवा आणि विश्वास प्राप्त झाल्यास केवळ स्वतःची नव्हे तर समाजाचीही प्रगती घडेल. कन्सल्टिंग सिविल इंजिनियर्स असोसिएशन, बेळगाव यांच्या वतीने आणि अल्ट्राटेक सिमेंट तसेच ब्ल्यू स्मार्ट एलिव्हेटर यांच्या संयुक्त विद्यमानाने सोमवारी संकम हॉटेल सभागृहात अभियंता दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात अल्ट्राटेकचे अनिल शिंदे आणि ब्ल्यू स्मार्ट एलिव्हेटरचे राहुल महालंक यांनी बांधकाम क्षेत्रातील तांत्रिक विषयांवर विचार मांडले.व्यासपीठावर अध्यक्ष रमेश जी.टी., सचिव विरेश शेट्टणणावर, खजिनदार चंद्रकांत मनगुत्ती, तसेच इव्हेंट चेअरमन एस.ए. पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली, तसेच भारतरत्न डॉक्टर एम. विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.रमेश जी.टी. यांनी अभियंत्यांवर सामाजिक जबाबदारी असते, हे लक्षात ठेवून कार्य करण्याचे आवाहन केले. सचिव विरेश शेट्टणणावर यांनी डॉक्टर विश्वेश्वरय्या यांच्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाला असोसिएशनचे पदाधिकारी सदस्य तसेच बांधकाम क्षेत्रातील बहुसंख्येने मान्यवर अभियंते उपस्थित होते.

**आपल्या वाढदिवसानिमित्त रक्तदान करा**

# स्व.शंकरराव घुले माथाडी कामगारांची सहकारी पतसंस्था वार्षिक सभा संपन्न



**अहमदनगर । रयत समाचार**
कष्टकऱ्यांच्या कुटूंबातील प्रत्येक सदस्यांच्या विकासासाठी कार्यरत असलेली स्व. शंकरराव घुले माथाडी कामगारांची सहकारी पतसंस्था यांची वार्षिक सभा नगरमध्ये उत्साहात पार पडली. यावेळी जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी सभेला मार्गदर्शन केले. सभेच्या अध्यक्षस्थानी चेअरमन रविंद्र भोसले, व्हाईस चेअरमन नवनाथ बडे, संचालक सुरेश मोहिते, आदिनाथ चेके, मच्छिंद्र दहिफळे, लक्ष्मण वायभासे, सागर पोळ, तसेच सभासद सौ. मंदाबाई सूर्यवंशी, रतनबाई आजबे, राम सरोदे, सचिव संजय महापुरे, तज्ञ संचालक संजय घुले, सहसचिव बबन सुसे उपस्थित होते. चेअरमन रविंद्र भोसले म्हणाले की, गेल्या ३२ वर्षांपासून पतसंस्थेने कष्टकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य सुनिश्चित केले आहे. सभासदांचा अपघात विमा उपलब्ध असून, सभासदांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी मदत तसेच गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे दिली जातात. पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांच्या गरजा पूर्ण होत असून, त्यांच्या जीवनात स्थैर्य निर्माण झाले आहे.व्हाईस चेअरमन नवनाथ बडे यांनी पतसंस्थेचा आर्थिक ताळेबंद सादर केला आणि राबविण्यात येत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. भविष्यातील योजना व प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती देखील सभेत स्पष्ट करण्यात आली. सहकार प्रशिक्षण केंद्राचे साखरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर सूत्रसंचालन सचिव संजय महापुरे यांनी केले आणि आभारसादरीकरण सहसचिव बबन सुसे यांनी केले. सभेत हमाल पंचायतचे उपाध्यक्ष गोविंद सांगळे, सचिव मधुकर केकाण, तसेच सदस्य सतीश शेळके, शेख उबेद, सचिन कर्पे, सचिन ठुबे, बहिरू कोतकर, रामा पानसंबळ, भाऊसाहेब शेळके, वाल्मिक कदम, चांगदेव कुसळकर, बाळासाहेब वडागळे, बाळासाहेब काळे, भालेराव, बाळासाहेब धनवटे आणि कर्मचारी कोसार पठाण, शाहूल वडागळे, युवराज राऊत, तबाजी कार्ले, अर्जुन शिंदे, असिफ कादरी आदी सभासद उपस्थित होते. अविनाश घुले म्हणाले की, पतसंस्थेच्या माध्यमातून कष्टकऱ्यांचे जीवनमान उंचावले जात असून, प्रत्येक सभासद आणि त्यांच्या कुटूंबाचा विकास हा पतसंस्थेचा मुख्य उद्देश आहे.

# आमदार जगताप यांनी केला मुख्य ड्रेनेजलाईन प्रवाह मोकळा

**अहमदनगर । रयत समाचार**
गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे नगरात ठिकठिकाणी पाणी साचण्याची समस्या निर्माण झाली होती. स्टेशन रोडवरील कोठी परिसरातून वाहणाऱ्या १२ इंच व्यासाच्या मुख्य ड्रेनेज गटार टेलचा शेवट सीना नदीपात्रात तुंबलेला होता. याची पाहणी आज आमदार संग्राम जगताप यांनी स्वतः सीना नदीपात्रात उतरून केली. त्यांनी महापालिका प्रशासनाला अत्याधुनिक सक्शन मशीनद्वारे गाळ व माती काढून मुख्य प्रवाह मोकळा करण्याचे आदेश दिले. यामुळे संपूर्ण मुख्य ड्रेनेज लाईनचा प्रवाह सुरळीत झाला आणि कोठी परिसर, माळीवाडा परिसर, राऊत मळा, अरिहंत कॉलनी, आदर्श कॉलनी, अजय गॅस मागील परिसर, मार्केट यार्ड व प्रभाग क्रमांक १३ व १४ मध्ये पाणी साचण्याची समस्या कायमस्वरूपी दूर झाली.
सभेत माजी उपमहापौर गणेश भोसले, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, माजी नगरसेवक संजय चोपडा, प्रकाश भागानगरे, मनपा अभियंता श्रीकांत निंबाळकर, स्वच्छता निरीक्षक ऋषिकेश भालेराव आदी उपस्थित होते.
पहा, कोठी परिसरापासून सुरू झालेल्या या लाईनवर अतिक्रमणे झाल्यामुळे पावसाचे पाणी, माती व गाळ वाहत न जाता टेल भागात साचले होते. तसेच काही अज्ञात लोकांनी नदीपात्राजवळ बांधकामाचे डेब्रिज ट्रॅक्टरने आणून टाकल्यामुळे लाईन चोकअप झाली होती. आमदार जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने ही समस्या कायमस्वरूपी सोडवली.



**सीना नदीपात्रात बांधकामाचे वेस्टेज डेब्रिज तसेच अन्य कचरा टाकता येऊ नये म्हणून लोखंडी पुलाशेजारील भाग कायमस्वरूपी बंद करण्यात येणार. तसेच भविष्यात याठिकाणी डेब्रिज, टाकाऊ वस्तु, कचरा आणून टाकल्यास त्यांच्यावर दंडात्मक कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे मनपा प्रशासनाने सांगितले.**

# नगरमध्ये १७ सप्टेंबर रोजी मेगा ब्लड डोनेशन कॅम्पचे आयोजन

**अहमदनगर । रयत समाचार**
युगप्रधान आचार्यश्री महाश्रमणजी यांच्या आशीर्वादाने आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त नगरमध्ये मेगा ब्लड डोनेशन कॅम्प आयोजित करण्यात आला आहे. दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत शहरातील तीन ठिकाणी रक्तदान शिबिरे होणार आहेत. रक्तदान शिबिरांचे आयोजन आनंदऋषीजी ब्लड बँक सेंटर, प्रेमदान चौक येथील हेल्पिंग हॅण्डस फॉर हंगर्स ग्रुप व नालेगाव जनकल्याण रक्तदान पेढी येथे करण्यात आले आहे. या उपक्रमाची माहिती भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते पाटील, भाजप जैन प्रकोष्ठचे प्रदेश सचिव सुदर्शन डुंगरवाल व श्री जैन श्वेतांबर तेरापंथी उपसभा, अहिल्यानगरचे प्रकाश बच्छावत यांनी दिली. भाजप पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत महासत्तेकडे वाटचाल करत असून, त्यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. रक्तदान हे माणुसकी धर्म जपणारे पवित्र कार्य आहे. या कार्यात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले. या रक्तदान अमृतमहोत्सव २.० चे नियोजन भाजप अहिल्यानगर शहर जिल्हा, भाजप व्यापारी आघाडी, भाजप शहर मंडळ, भाजप जैन प्रकोष्ठ सेल यांच्यासह विविध सामाजिक संस्थांनी केले आहे. उपक्रमास शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्यासह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

# नियमित आरोग्य तपासणी केल्यास गंभीर आजार टाळता येतात

## पटेल स्पेशालिटी क्लिनिकतर्फे पैगंबर जयंतीनिमित्त मोफत आरोग्य शिबिर

**अहमदनगर । रयत समाचार**
आजच्या धावपळीच्या जीवनात आरोग्य हेच खरे धन आहे. मधुमेह, हृदयविकार, थायरॉईड अशा अनेक आजारांची वेळेत तपासणी न झाल्यास त्यांचे गंभीर परिणाम दिसून येतात. त्यामुळे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता वेळोवेळी तपासणी करणे अत्यंत गरजेचे आहे.आमचे ध्येय केवळ उपचार देणे नाही, तर समाजात आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे हे देखील आहे. पैगंबरांच्या शिकवणीनुसार इतरांची सेवा करणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हेच खरे इबादत आहे. आजच्या शिबिराला मिळालेला प्रतिसाद आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करत राहू. असे प्रतिपादन डायबेटोलॉजिस्ट व हृदयरोग विकार तज्ञ डॉ.अशफाक पटेल यांनी केले. पैगंबर जयंतीच्या औचित्याने पटेल



स्पेशालिटी क्लिनिक यांच्या वतीने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिरात रुग्णांना विविध आजारांवरील तपासण्या मोफत करून देण्यात आल्या. विशेषतः रक्तातील थायरॉईड, तीन महिन्यातील साखर (एचडी वन सी), कोलेस्टेरॉल, रक्तातील साखर इत्यादी महत्त्वपूर्ण तपासण्या रुग्णांना विनामूल्य करून देण्यात आल्या. या प्रसंगी डायबेटोलॉजिस्ट व हृदयरोग तज्ञ डॉ. अशफाक पटेल यांच्यासह प्रकाश मुनोत, तुषार वर्पे, आकाश हिवाळे, विक्रम मार्कंड, हर्षल मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिराचा लाभ मोठ्या संख्येने रुग्णांनी घेतला. नियमित आरोग्य तपासणी केल्यास गंभीर आजार टाळता येतात, याबाबत जनजागृतीही करण्यात आली. वारंवार अशा उपक्रमांचे आयोजन केल्यामुळे रुग्णांनी समाधान व्यक्त करून डॉ. अशफाक पटेल व पटेल स्पेशालिटी क्लिनिकचे आभार मानले.

# आरोग्यवर्धिनीच्या योग-निसर्गोपचार प्रशिक्षणार्थ्यांचा गौरव

**अहमदनगर । प्रतिनिधी**
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ संलग्न आरोग्यवर्धिनी योग-निसर्गोपचार संस्थेतर्फे आयोजित 'डिप्लोमा इन योगा इन नॅचरोपॅथी' प्रशिक्षण शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. प्रशिक्षणामध्ये उत्तीर्ण झालेल्या युवक-युवती व महिलांना प्रमाणपत्र वितरण करून गौरविण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक शीतल मोहन मुगडे व कोतवाली पोलीस स्टेशनच्या श्वेता मॅडम यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण झाले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. हेमांगिनी पोतनीस, संचालिका हेमा सेलोत, तनपुरे सर, दिपीका कराचीवाला, साक्षी मेहतानी, रुतुजा गिते, दिप्ती गांधी, ऐश्वर्या देवी आदी मान्यवर उपस्थित होते. पुण्यातील वैशाली नाईक यांनी ''आनंदी व निरोगी जीवनासाठी योग, निसर्गोपचार आणि ध्यान'' या विषयावर मार्गदर्शन केले. आरोग्यवर्धिनी योग-निसर्गोपचार संस्था मागील ४० वर्षांपासून योग-निसर्गोपचाराचा प्रचार-प्रसार करत असून, शास्त्रोक्त प्रशिक्षण देत आहे. या अभ्यासक्रमाला टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची मान्यता आहे. डॉ. ऐश्वर्या शहा-देवी म्हणाल्या की, ''निरोगी व आनंदी जीवनासाठी नॅचरोपॅथी जीवनशैली अवलंबणे आवश्यक आहे. सौंदर्य खुलवण्यासाठी नैसर्गिक उत्पादने महत्त्वाची आहेत. निसर्गोपचारातून महिलांना रोजगार निर्मितीची संधी मिळत आहे. गेल्या १२ वर्षांपासून नैसर्गिक सौंदर्य प्रसाधनांना महिला वर्गाकडून चांगली मागणी आहे.'' डॉ. हेमांगिनी पोतनीस म्हणाल्या की, ''ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करत असतानाही आम्ही ४० वर्षांपासून समाजासाठी नॅचरोपॅथीचा प्रसार करत आहोत. संस्थेतून विविध कोर्सेसद्वारे शास्त्रोक्त धडे दिले जातात.'' हेमा सेलोत यांनी सांगितले की, ''नॅचरोपॅथीद्वारे सहजपणे कुटुंबाचे आरोग्य सांभाळता येते. प्रशिक्षणार्थी स्वतःच्या कुटुंबाचे आरोग्य सांभाळण्याबरोबरच समाजातही आरोग्यजागृती करत आहेत. योग-निसर्गोपचाराच्या धड्यांमुळे अनेकांना स्वावलंबनाची संधी मिळाली आहे.''

# २९ सप्टेंबरपर्यंत मागण्या पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन- विनोदसिंग परदेशी

**अहमदनगर । प्रतिनिधी**
शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने तहसील कार्यालयासमोर भजन आंदोलन करून तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.
या वेळी नाशिक-संभाजीनगर संपर्कप्रमुख व जिल्हाध्यक्ष विनोदसिंग परदेशी, जिल्हा मुख्य सल्लागार भगवान भोगाडे, जिल्हा उपाध्यक्ष अविनाश ठाणगे, पप्पू येवले, जिल्हा सचिव प्रकाश बेरड, जिल्हा समन्वयक विजुभाऊ भंडारे, तालुकाध्यक्ष शंकर बेरड, शेतकरी तालुकाध्यक्ष प्रवीण पिंपळे, सेल तालुका अध्यक्ष नाना पारधे, युवक जिल्हाध्यक्ष सुरज ठोकळ, युवक तालुका अध्यक्ष सागर जाधव, तालुका उपाध्यक्ष भरत कांगुर्णे, शहराध्यक्ष कृष्णा खिळे, श्रीगोंदा विधानसभा अध्यक्ष वामन भदे, श्रीगोंदा तालुका अध्यक्ष सुरेश सुपेकर, प्रसिद्धी प्रमुख जिल्हा दिव्यांग पोपट शेळके, नगर तालुका अध्यक्ष किशोर सूर्यवंशी आदींसह शेतकरी मोठ्या



संख्येने सहभागी झाले होते.
निवेदनात सरकारी योजनांचा लाभ त्वरित मिळावा,संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, राज्य निवृत्ती वेतन योजना यांची प्रक्रिया सोपी करावी, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात,विधवा महिलांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य द्यावे,शेती मोजणीची प्रक्रिया तातडीने व सोपी करावी,शेतकरी, विधवा व दिव्यांगांना न्याय मिळवून देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. या व इतर मागण्या करण्यात आल्या आहेत .
निवेदन स्वीकारताना तहसीलदारांनी योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. तथापि, मागण्या २९ सप्टेंबरपर्यंत पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष विनोदसिंग परदेशी यांनी दिला.
या आंदोलनावेळी कार्यकर्त्यांनी कीर्तन-भजनातून शासनाचे लक्ष वेधत मागण्यांसाठी आवाज उठवला.


## रयत समाचार Classified छोटी जाहिरात

### छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक










**हॉटेल भाड्याने देणे**
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
**- संपर्क -**
**९०११११३७००**

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# बालआधार, संजय गांधी निराधार योजना, मतदार नोंदणी कॅम्प उत्साहात संपन्न



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

राक्षी ग्रामपंचायत कार्यालयात ता. १६ सप्टेंबर रोजी बालआधार कॅम्प, संजय गांधी निराधार योजना व मतदार नोंदणी कॅम्पाचे आयोजन करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या विशेष नियोजनासह शेवगाव पोस्ट ऑफिसच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे हा कॅम्प यशस्वी पार पडला. या कॅम्पमध्ये एकूण ३२ बालआधार कार्डे काढण्यात आली. संजय गांधी निराधार योजनेसाठी ३४ अपंग, निराधार व विधवा महिलांनी आपली कागदपत्रे जमा केली. तसेच मतदार नोंदणीसाठी सुमारे ४० जणांनी अर्ज सादर केला. दीर्घकाळ प्रलंबित असलेली ही कामे पूर्ण झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कॅम्पच्या यशस्वी आयोजनासाठी पोस्ट ऑफिसचे भुसारे, गाढे (पोस्टमन) व अन्य कर्मचारी यांनी मोलाचे योगदान दिले. प्राथमिक उपदेश सतीश मगर, कृष्णा जुंबड व अतुल जुंबड यांनी केला. पोस्ट ऑफिसविषयी माहिती भुसारे यांनी दिली, तर महेश (रिंकू शेठ) फलके यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून महेश (रिंकू शेठ) फलके (तालुका अध्यक्ष भाजप, शेवगाव), नगरसेवक सागर शेठ फडके, विनोद शिंदे, रामेश्वर भापकर (सरपंच दहिगाव), राजू गोरे (सरपंच राक्षी), अफसर भाई शेख, भारत कातकडे, राजूभाऊ दोरखे, गुलाब आप्पा मगर, आत्माराम गव्हाणे, सुरेश कातकडे, उद्धव कातकडे, दिगंबर जगधने, अख्तर शेख, नामदेव जुंबड, कृष्णा जुंबड, सागर जगधने, राहुल जुंबड, शंकर जुंबड, सिताराम वाघ, भाऊसाहेब जुंबड आदी मान्यवर उपस्थित होते. या कॅम्पचे आयोजन उपसरपंच अतुल अभिमान जुंबड यांनी केले होते. त्यांच्या या उपक्रमाबद्दल ग्रामस्थ व ज्येष्ठ नागरिकांनी त्यांचे आभार मानले.

# रस्त्याच्या निकृष्ट कामामुळे नागरिक संतप्त; काम थांबवले

## सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी

**कोपरगाव । किसन पवार**

तालुक्यातील झगडेफाटा ते रांजणगाव देशमुख हा रस्ता अत्यंत खराब स्थितीत आहे, अशी तक्रार वारंवार नागरिकांनी केली होती. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्यावर फक्त मुरूम टाकून खड्डे बुजवण्याचे काम सुरू केले होते, मात्र नागरिक या कामावर समाधानी नसल्याने त्यांनी काम थांबवून विभागाला लेखी निवेदन दिले आहे. नागरिकांनी सांगितले की, तब्बल दहा कोटी रुपयांचा निधी खर्च करून दर्जेदार डांबरीकरण अपेक्षित असताना प्रत्यक्षात फक्त मुरूम टाकून खड्डे बुजवण्याचा केविलवाणा प्रकार सुरू आहे. त्यामुळे रस्ता खड्डेमय होऊन प्रवाशांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. नागरिकांचा आरोप आहे की, या कामात



पारदर्शकतेचा अभाव असून ठेकेदार आणि सत्ताधारी यांच्या मिलीभगतीने निधीचा दुरुपयोग होत आहे. वारंवार तक्रारी करूनही संबंधित प्रशासन व लोकप्रतिनिधींकडून कोणतीही दखल घेतली गेली नाही, त्यामुळे नागरिकांचा रोष उधाणाला आला आहे. आमदारांच्या निष्काळजीपणावरही प्रश्न उपस्थित आहेत. दररोज या मार्गावरून शालेय विद्यार्थी, शेतकरी आणि सामान्य प्रवासी मोठ्या संख्येने प्रवास करतात. खड्डेमय रस्त्यामुळे अपघातांची शक्यता वाढली असून, जनतेच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला आहे. झगडेफाटारांजणगाव हा तालुक्याला जोडणारा प्रमुख मार्ग असल्याने या निकृष्ट कामाचा फटका संपूर्ण परिसरातील नागरिकांना बसत आहे. नागरिकांनी या कामाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. ठेकेदारांची बेफिकिरी आणि सत्ताधाऱ्यांचा ढिसाळ कारभार थांबवून जबाबदारांकडून उत्तरदायित्वाची जाणीव करून द्यावी, अशी एकमुखी मागणी नागरिकांची आहे.

# निंबळक-नागापुर रस्ता; पाऊस थांबताच कामाला सुरुवात होणार

**नगर तालुका । प्रतिनिधी**

मागील चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या निंबळक-नागापुर रस्त्यावरील सन फार्मा कंपनी ते सावली हॉटेल दरम्यान रस्त्याच्या कामाला लवकरच सुरुवात होणार आहे.या कामासंदर्भात पंचायत समितीचे माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार यांनी एमआयडीसीचे अभियंता संदिप बडगे यांची भेट घेऊन चर्चा केली. त्यावेळी बडगे यांनी निविदा प्रक्रिया नऊ दिवसांपूर्वी पूर्ण झाली असून पाऊस थांबताच तात्काळ काम सुरू होणार आहे, असे सांगितले. प्रथम खड्डे बुजविले जातील, त्यानंतर स्ट्रीट लाईटची दुरुस्ती करून रस्त्याच्या मधोमध घेतली जाईल आणि संपूर्ण डांबरीकरण करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. हा रस्ता पूर्णपणे खड्डेमय झाल्यामुळे हजारो नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. आजवर या ठिकाणी अनेक अपघात झाले आहेत. अवजड वाहनांची सततची ये-जा व निकृष्ट दर्जाचे काम यामुळे रस्ता धोकादायक बनला होता. त्यामुळे वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत होते. गंभीर स्वरूपाचा हा प्रश्न लक्षात घेऊन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विशेष लक्ष दिले, तसेच आमदार काशीनाथ दाते यांचे सहकार्य मिळाले. या प्रकरणी डॉ. दिलीप पवार, बी.डी. कोतकर, सोमनाथ खांदवे, संजय चौधरी यांनी वारंवार एमआयडीसी कार्यालयाशी पत्रव्यवहार केला, आंदोलन केले. तरीही काम न झाल्यामुळे नागरिकांना रस्त्यावर उतरावे लागले होते. तत्कालीन अधिकारी वाघ यांच्या काळात हे काम अपूर्ण राहिले होते. मात्र, संदिप बडगे यांनी एमआयडीसी कार्यालयाचा पदभार घेतल्यानंतर नव्याने प्रस्ताव तयार करून मंत्रालय स्तरावर मंजुरी मिळवली. मागील आठवड्यात पुणे कार्यालयात निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन नवीन एजन्सी नियुक्त करण्यात आली आहे.अभियंता संदिप बडगे यांनीही येत्या आठ दिवसांत कामास सुरुवात होईल असे स्पष्ट केले असून, या कामात दुभाजक, स्ट्रीट लाईटसह सर्व आवश्यक सुविधा बसविण्यात येतील, अशी माहिती दिली.

# राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत अनुज धायतडक प्रथम




**श्रीरामपूर । संदीप पाळंदे**

येथील एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीच्या ऑनलाईन शाखेचा विद्यार्थी अनुज बाळू धायतडक याने मुंबई येथे दि. १४ रोजी झालेल्या ४१ व्या राष्ट्रीय अबॅकस स्पर्धेत देशभरातील स्पर्धकांना मागे टाकत प्रथम क्रमांक पटकावला. अनुजने अवघ्या पाच मिनिटांत १०३ गणिते सोडवून ही कामगिरी केली. उत्कृष्ट गणनाशक्ती व एकाग्रतेच्या बळावर अनुजने राष्ट्रीय स्तरावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. या यशामागे श्रीरामपूर येथील अकॅडमीच्या संचालिका सोनाली भाग्येश ठाणगे यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन लाभले. अनुजच्या या यशामुळे एव्हरेस्ट अबॅकस अकॅडमीसह श्रीरामपूर तालुक्याचा लौकिक अधिक वाढला आहे. शहरात आनंदाचे व अभिमानाचे वातावरण असून शैक्षणिक संस्था, पालकवर्ग व मान्यवरांनी अनुजचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त भागांची विक्रम पाचपुते यांनी पाहणी केली

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार विक्रम पाचपुते यांनी सारोळा बद्दी, चिंचोडी पाटील आणि आठवड येथील अतिवृष्टीग्रस्त भागांचा दौरा करून नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे या भागात शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, मुळे सडली आहेत, शेततळ्यांमध्ये पाणी भरले आहे आणि नदीपात्रातील पाण्याची पातळी धोक्याच्या रेषेपेक्षा जास्त आहे. यामुळे शेतकऱ्यांना मोठे संकट निर्माण झाले आहे. आमदार पाचपुते यांनी तहसीलदार दळवी, काकडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गीते यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी सोबत घेऊन ठिकठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली. शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांनी त्यांच्या व्यथा ऐकल्या आणि प्रशासनाकडे तातडीने पावले उचलण्याचे आदेश दिले. आमदारांनी नागरिकांना दिलासा देत पुढील बाबींवर ठाम भूमिका मांडली: प्रशासनाकडून तातडीने पंचनामे करणे,नुकसानभरपाईसाठी शासन दरबारी



पाठपुरावा,बाधितांना योग्य मोबदला आणि मदतीची हमी. शेतकऱ्यांनी शासनाकडे मागणी केली की, नुकसानाची संपूर्ण माहिती करून अहवाल सादर करावा, भरपाईचा जलद निर्णय घेऊन आर्थिक मदत थेट द्यावी, नुकसानग्रस्त घरांसाठी तात्पुरता निवारा, तसेच वैद्यकीय व अन्नधान्य सहाय्य तत्काळ उपलब्ध करून द्यावे. आमदार पाचपुते यांच्या सक्रिय आणि तत्पर नेतृत्वामुळे या संकटकाळात नागरिकांना आश्वासक वाटत आहे. त्यांनी पुढील काही दिवसांत नुकसानभरपाई व पुनर्वसन प्रक्रियेवर लक्ष ठेवून प्रशासनाच्या कार्यवाहीचा आढावा घेण्याचे संकेत दिले आहेत.

# शासन पूरग्रस्तांच्या पाठीशी पालकमंत्री राधाकृष्ण विखे

## पूरग्रस्तांना मदतीसाठी निधीची मागणी करणार

**पाथर्डी । नितीन गटाणी**

तालुक्याच्या इतिहासात दुर्मिळ अशी अतिवृष्टी दोन दिवसात पडून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतकरी, नागरिक, जनावरे, घरसाहित्य आणि व्यापाऱ्यांचे मालमत्ता वाहून गेल्याची माहिती मिळाली आहे. जलसंपदा तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले की, झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण युद्धपातळीवर सुरू असून पूरग्रस्तांना मदतीसाठी मोठ्या निधीची आवश्यकता आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निधीची मागणी केली जाणार आहे. दोन दिवसांपूर्वी पाथर्डी व शेवगाव तालुक्यात ढगफुटी सदृश पाऊस पडल्याने अनेक गावांची शेती, फळबागा, चारा पिके, भाजीपाला यांचे मोठे नुकसान झाले. जनावरे वाहून गेली, घरसाहित्य आणि वाहने नष्ट झाली, तर काही गावांमध्ये व्यापाऱ्यांचेही कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले. पालकमंत्री विखे यांनी पूरग्रस्त



भागाचा पाहणी दौरा करत करंजी, देवराई, तिसगाव, कासार, पिंपळगाव तसेच पाथर्डी शहरातील नागरिकांचे निवेदन स्वीकारले. तालुक्यातील प्राथमिक सर्वेक्षणानुसार सुमारे ५० हजार हेक्टर क्षेत्रातील ६९ हजार शेतकऱ्यांची शेती पिकांचे नुकसान झाले असून, दोन नागरिकांचा पुराच्या पाण्यात मृत्यू झाला. विखे म्हणाले की, पूर ओसरल्यानंतर नुकसानाचे पूर्ण अंदाज येईल; तरीही शासन पूरग्रस्तांच्या पाठीशी उभे आहे. नदी, ओढे, नाले यांचे प्रवाह बदलल्यामुळे नुकसान जास्त झाले असून, भविष्यात अशी परिस्थिती टाळण्यासाठी पावसाळ्यानंतर तिकडे तातडीने अतिक्रमणे हटवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, जलसंपदा विभागाचे अधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार तसेच भाजप आणि इतर पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी आपतग्रस्तांशी थेट संवाद साधून प्राथमिक मदत व पुनर्वसन योजनेचे नियोजन केले. विखे यांनी स्पष्ट केले की, पूरग्रस्तांना घरकुल, फूड पॅकेट व आर्थिक मदत उपलब्ध करून देण्यात येईल, तसेच मुख्यमंत्र्यांना भेटून वाढीव निधीची मागणी केली जाईल.

# ग्रामीण विकासाला ऊर्जा देण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागातर्फे ग्रामीण विकासाला ऊर्जा देण्यासाठी ‘‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान‘‘ राबविण्यात येणार आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींना स्पर्धात्मक पद्धतीने प्रोत्साहित करून कार्यक्षमता वाढविणे, शासकीय योजना प्रभावीपणे अंमलात आणणे आणि ग्रामीण जीवनमान उंचावणे हा



या अभियानाचा उद्देश आहे, अशी माहिती सहाय्यक गटविकास अधिकारी रणजीत अकुलवार यांनी दिली. या अभियानात ग्रामपंचायतींना नागरिकांसाठी ऑनलाईन सेवा उपलब्ध करून देणे, तक्रार निवारण, संकेतस्थळ निर्मिती, सीसीटीव्ही बसविणे, आयुष्मान भारत व दिव्यांग ओळखपत्र वाटप अशी पावले उचलली जाणार आहेत. पंचायतांचा महसूल वाढविणे, लोकवर्गणीद्वारे लोकोपयोगी कामे, शुद्ध पाणीपुरवठा, सौर ऊर्जा वापर, वृक्षलागवड व प्लास्टिकबंदी हे उपक्रमही राबविण्यात येतील. मनरेगा व इतर योजनांतून जलसंधारण, गोठे, कुक्कुटपालन शेड, वायोगॅस आदी कामांना चालना दिली जाईल. गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण, शाळा व अंगणवाड्यांचा दर्जा उंचावणे, क्रीडांगण, व्यायामशाळा व स्मशानभूमी विकास यालाही प्राधान्य मिळणार आहे. महिलांना ‘‘लखपती दीदी‘‘ करण्यासाठी बचत गट, तसेच युवकांना कौशल्य प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. लोकसहभाग व श्रमदानातून चळवळ उभी करून गावांचे सर्वांगीण परिवर्तन करणे हे या अभियानाचे मुख्य ध्येय आहे. ग्रामीण भागातील सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन अकुलवार यांनी केले.

# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन

आज १७ सप्टेंबर, आजचा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम दिन म्हणून साजरा केला जातो. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले मात्र मराठवाडा प्रांत हा पारतंत्र्यातच होता. पूर्वी मराठवाडा हैदराबाद संस्थांनात विलीन होता. हैदराबाद संस्थानावर निजाम उर उस्मान अली खान निजाम उल मुल्क आसफजाह याचे राज्य होते. निजामाने हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यास स्पष्ट नकार दिला होता. मात्र हैदराबाद संस्थानातील जनता भारतात सामील होण्याच्या बाजूने होते. निजामाच्या संस्थानातून मुक्त होऊन भारतीय संघ राज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैदराबाद संस्थानात मुक्ती संग्राम आंदोलन सुरू झाले. हैदराबाद संस्थानाची लोकसंख्या त्यावेळी दीड कोटीच्या वर होती. या संस्थांनात तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकचा काही भाग होता. मुक्ती संग्राम सुरू झाल्यावर निजामाचा सेनापती कासीम रिझवी याने जनतेवर खूप अत्याचार केले. दुसऱ्या बाजूला स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, बाबासाहेब परांजपे यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य संग्राम वेगात सुरू होता. मराठवाडा मुक्ती संग्राम मराठवाड्यातील गावागावात लढला जात होता. यात हजारो स्वातंत्र्य सैनिक पुढे आले. स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रदीर्घ लढ्यानंतरही निजाम शरण येत नाही उलट जनतेवरील अन्याय अत्याचार वाढतच आहे हे पाहून १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद संस्थानात पोलीस कारवाई सुरू केली. सरदार वल्लभभाई पटेल हे त्यावेळी भारताचे गृहमंत्री होते. ते खूप धाडसी होते त्यांच्या धाडसी आणि अचूक निर्णयाने जनतेस न्याय मिळाला. मुख्य फौजा सोलापूरकडून घुसल्या. पहाटे चार वाजता कारवाई सुरू झाल्यावर २ तासात नळदुर्ग व सायंकाळ पर्यंत तुळजापूर, परभणी ते मणीगड, कनेरगाव भारतीय फौजांनी सर केले. चाळीसगावहुन निघालेल्या फौजेने कन्नड,दौलताबाद काबीज केले. १५ सप्टेंबर रोजी औरंगाबाद सर करून भारतीय फौजा पुढे निघाल्या. भारतीय फौजांपुढे निजामाच्या फौजेचे काही चालले नाही. अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाचा सेनाप्रमुख जनरल अल इद्रीस याने शरणागती पत्करली. सेनाप्रमुखच शरण गेल्याने निजामही शरण आला. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या गुलामीतून मुक्त झाले. हैदराबाद मुक्ती संग्राम यशस्वी झाला. हैदराबाद संस्थानावर तिरंगा फडकला. हैदराबाद संस्थानातील निजामाच्या अन्यायी राजवटी विरुद्धचा लढा मराठवाड्यातील जनतेने यशस्वी केला . तेंव्हापासून आजचा दिवस म्हणजे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्ती संग्राम म्हणून साजरा केला जातो. मराठवाडा मुक्ती संग्रामात ज्या ज्ञात अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली त्या स्वातंत्र्य सैनिकांना मानाचा मुजरा. सर्व मराठवाडा वासीयांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# शिक्षक हा समाजाचा पाया- काठमोरे

## रायझिंग ट्रायबल फाउंडेशन, स्वाभिमानी शिक्षक संघटनेतर्फे शिक्षकांचा सन्मान



**अहमदनगर । रयत समाचार**

रायझिंग ट्रायबल फाउंडेशन व महाराष्ट्र राज्य स्वाभिमानी शिक्षक संघटनेच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय शिक्षक गौरव सोहळ्यात तब्बल ३७ गुणवंत शिक्षकांना राज्यस्तरीय शिक्षक गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमात प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे शिक्षण सहसंचालक रमाकांत काठमोरे, माजी शिक्षण संचालक दिनकर टेमकर, मनपा शिक्षण विभागाचे प्रशासनाधिकारी जुबेर पठाण आणि माजी नगरसेवक योगीराज गाडे यांच्या हस्ते शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व स्वाभिमानी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रसाद शिंदे यांनी या सोहळ्याचे आयोजन केले होते.शिंदे यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, फाउंडेशनतर्फे सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत. गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य सतत सुरू आहे. शिक्षकांचे विविध प्रश्न सोडवून त्यांचा सन्मान वाढविण्याचे ध्येय संघटना जोपासत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.रमाकांत काठमोरे म्हणाले की, ''शिक्षक हा समाजाचा पाया आहे. भावी पिढी घडविण्याची जबाबदारी शिक्षकांवर आहे. विद्यार्थी घडविणे हेच शिक्षकाचे ध्येय असले पाहिजे.'' त्यांनी प्रसाद शिंदे यांच्या कार्याचेही कौतुक केले.दिनकर टेमकर यांनी शिक्षक-विद्यार्थी यांचे नाते अजूनही घट्ट असल्याचे सांगितले. ''अशैक्षणिक कामांच्या भारातही शिक्षक प्रामाणिकपणे काम करतात,'' असे ते म्हणाले. जुबेर पठाण यांनी शिक्षकांना शुभेच्छा देत फाउंडेशनच्या उपक्रमांची प्रशंसा केली.
योगीराज गाडे म्हणाले, ''अल्प वेतनातही शिक्षक प्रामाणिकपणे कार्य करतात. प्रत्येक यशस्वी विद्यार्थ्यामागे पालकांसह शिक्षकांचे योगदान असते.''या सोहळ्यात डॉ. अर्शद सय्यद, शिक्षक नेते रवींद्र गावडे, बाळासाहेब वाकचौरे आदी मान्यवरांनी भाषणे करत शिक्षकांचे समाजातील महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बंडू गाडेकर, राजेंद्र सोनवणे, अमोल क्षीरसागर, बाबासाहेब गवते, अंतोन मिसाळ, अनिता साठे, रिबिका क्षेत्रे, मुन्नवर खान, नियाज शेख, प्रमोद जाधव, महेंद्र तागड, देवराम दरेकर, प्रवीण साळवे, विजय साळवे, रवी चांदेकर, किशोर कार्ले आदींनी परिश्रम घेतले.

# शिक्षण मोफत व पर्यावरण संरक्षणासाठी गवते यांचे आमरण उपोषण

## २२ सप्टेंबरपासून वांबोरी येथे आंदोलनाला सुरुवात

**अहमदनगर । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना शिक्षण व उच्चशिक्षण कायमस्वरूपी मोफत उपलब्ध करून देणे आणि पर्यावरण संरक्षणासाठी ठोस उपाययोजना राबविण्याच्या मागणीसाठी पर्यावरण रक्षक गोरक्षनाथ विश्वनाथ गवते यांनी २२ सप्टेंबरपासून आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. हे उपोषण राहुरी तालुक्यातील वांबोरी येथील पाचीमहादेव मंदिर परिसरात होणार असून, प्रशासनाने दखल घेतली नाही तर आत्मदहनाचा इशाराही गवते यांनी दिला आहे.



गवते हे २०११ पासून पर्यावरण रक्षक उपक्रम सातत्याने राबवत आहेत. त्यांच्या उपक्रमांतर्गत ''एक विद्यार्थी एक झाड, एक व्यक्ती एक झाड'' यासह कुऱ्हाडबंदी, डीजे बंदी, हुंडाबंदी, व्यसनबंदी, प्लास्टिकबंदी, शिकारबंदी, खाजगी सावकारकी बंदी, भ्रष्टाचारबंदी अशा अनेक जनजागृती मोहिमा राबवल्या आहेत. तसेच संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, हागणदारीमुक्त गाव, घर तेथे शौचालय, विषमुक्त शेती, रोगमुक्त भारत, पाणी आडवा पाणी जिरवा, बेटी बचाव बेटी पढाव अशा सामाजिक अभियानांतही ते सक्रिय आहेत.
गवते म्हणाले की, ''जिल्हा परिषदेपासून महाविद्यालयांपर्यंत विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल प्रेम आणि जिव्हाळा निर्माण करणे हेच माझे ध्येय आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा पर्यावरण रक्षक नागरिक होईल. स्वच्छ, सुंदर, निरोगी आणि बलशाली भारत घडविण्यासाठीच हे प्रयत्न सुरू आहेत.''
पर्यावरण रक्षण आणि मोफत शिक्षण या मागण्यांसाठी गवते यांनी यापूर्वी अनेक वेळा उपोषण व आंदोलन केले आहे. मात्र, आत्मदहनाची चेतावणी दिल्यानंतरही प्रशासनाने ठोस उपाययोजना केलेल्या नाहीत. त्यामुळे २२ सप्टेंबरपासूनचे उपोषण अखेरपर्यंत सुरू ठेवले जाईल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.
''या लढ्याला प्रशासनाने प्रतिसाद दिला नाही तर माझीच अंत्ययात्रा वांबोरीतून निघेल. या आंदोलनात पर्यावरणप्रेमी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्षांचे नेते आणि सर्वसामान्य जनतेने सहभागी होऊन पाठिंबा द्यावा,'' असे आवाहन गवते यांनी केले आहे.

# पंचायतराज अभियान चळवळ म्हणून राबविण्याची गरज- दळवी

**कोपरगाव । किसान पवार**

पंचायत समितीचे प्रभारी गटविकास अधिकारी संदीप दळवी यांनी ''मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान'' योजना चळवळ म्हणून राबविण्याचे महत्त्व अधोरेखित केले.
त्यांनी सांगितले की, ही योजना ग्रामपंचायती, पंचायत समिती व जिल्हा परिषदांच्या माध्यमातून तालुका, जिल्हा, महसूल व राज्य स्तरावर राबविली जाणार असून यासाठी २९० कोटी ३३ लाख रुपयांची तरतूद मंजूर आहे. अभियानाचा उद्देश



ग्रामपंचायतींची कार्यक्षमता वाढविणे, शासकीय योजना प्रभावीपणे अंमलात आणणे, योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे आणि लोकांचे जीवनमान उंचावणे आहे.
यामध्ये उत्पन्नवाढीसाठी उपाययोजना, घरपट्टी व पाणीपट्टी ८० टक्के वसूल करणे, लोकवर्गणीद्वारे लोकोपयोगी कामे करणे, ऑनलाईन सेवा उपलब्ध करणे, वेबसाईट तयार करणे, सीसीटीव्ही बसविणे तसेच आयुष्यमान भारत कार्ड व दिव्यांग ओळखपत्र वितरण यावर भर दिला जाणार आहे. याशिवाय गाव जलसमृद्ध करणे, स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे, शुद्ध पाणी पुरवठा करणे व सौरऊर्जा वापर वाढविणे या उपक्रमांनाही गती मिळणार आहे.



## ढगफुटीसदृश पावसामुळे जनजीवन विस्कळीत

# खासदार लंके यांनी केली पाहणी

**पाथर्डी । नितीन गटाणी**

शेवगाव मतदार संघातील ढगफुटीसारख्या पावसामुळे मागील दोन दिवसांपासून घर, दुकानं, शेती आणि जनावरे मोठ्या प्रमाणात वाहून गेली आहेत. या भीषण परिस्थितीमुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असून शाळा, दवाखाने व बाजारपेठा ठप्प झाल्या आहेत.
आज सकाळी खासदार निलेश लंके यांनी करंजी, देवराई, घाटशिरस, तिसगाव, पाथर्डी शहर, शिरसाटवाडी, रांजणी, कारेगाव यासह इतर प्रभावित भागांचा प्रत्यक्ष दौरा केला. यावेळी मा. जि. प. सदस्य गहिनीनाथ शिरसाट, सरपंच अविनाश पालवे, नगरसेवक बंडू बोरुडे, तसेच स्थानिक नेते उपस्थित होते.
दौऱ्यादरम्यान खासदार लंके म्हणाले की, ''फक्त पिकांचे नुकसानच नाही, तर जनावरे, अन्नधान्य व संसार उपयोगी साहित्यही वाहून गेले आहे.


**खासदार लंके यांनी सर्व ग्रामस्थांना आश्वस्त केले की स्थानिक आजी-माजी लोकप्रतिनिधी व खासदार लंके यांच्या लक्षावर नुकसानभरपाई व पुनर्वसन प्रक्रियेवर सतत देखरेख ठेवली जाईल.**


अनेक व्यापारी बांधवांच्या दुकानांमध्ये मालाचे नुकसान झाले आहे. रस्त्यांवर पूले वाहून गेली असून फक्त नळ्याच शिल्लक आहेत. काही तलाव फुटण्याच्या मार्गावर आहेत. याची तातडीने दुरुस्ती करणे गरजेचे आहे.''
खासदार लंके यांनी प्रशासनाला अपवादात्मक परिस्थिती समजून तातडीने भरीव मदत देण्याचे आदेश दिले आणि म्हटले की, ''सरकारकडे मदतीच्या आशेने डोळे लावून बसलेल्या आपतग्रस्तांना तात्काळ मदत करणे आवश्यक आहे. अन्यथा लंके स्टाईल आंदोलनाच्या माध्यमातून सरकारला नागरिकांच्या नाका-तोंडात गेलेले पाणी बाहेर काढण्यासाठी दबाव टाकण्याची तयारी आम्ही केली आहे.''


ICRDILS - 2025
BPHES AHMEDNAGAR COLLEGE
Life Sciences
INTERNATIONAL CONFERENCE
RECENT DISCOVERIES AND INNOVATIONS IN LIFE SCIENCES
(ICRDILS-2025)
18th and 19th September, 2025
TITLES OF INVITED SPEAKERS



DR. BHUSHAN PATWARDHAN
Distinguished Professor IIT Kharagpur,
National Research Professor – Ayush & SPPU
Dr. Vijay Khanna Memorial Lecture
Novel Trends in Drug Discovery and Pharmaceutical Research



DR. JAYAPRAKASH MULIYIL
CMC, Vellore
Life in Science: Is it a Pursuit of Fame, Fortune, or Truth?



DR. MANOHAR R. FURTADO
USA
How Pigs are Saving Humans: Xenotransplantation


DR. PORUNELLOOR MATHEW
USA
Advances in Cancer Immunotherapy: CAR-T cell and CAR-NK cell



DR. SHARMILA BAPAT
NCCS, Pune
To be announced soon



DR. CHITRA F. MANOHAR
USA
Advances in Medical Diagnostics for Global Near-Patient Care


DR. SURENDRA GHASKADBI
ARI, Pune
Hydra: Genes, signals, and stem cells An extraordinary research organism and a great teaching tool


DR. SHANKAR SWAMINATHAN
USA
Process Chemistry, Pharma, and FDA


DR. ARVIND A NATU
IISER, Pune
To be announced soon



DR. SHUBHANGEE M. MUNGRE
USA
Immunological Properties of Human Breast Milk



DR. C. K. JOHN
NCL, Pune
To be announced soon



DR. RAHUL BHAMBURE
NCL, Pune
To be announced soon



DR. RAGHAVENDRA P. GAIKAIWARI
HTBS, Pune
Biocatalysis - An Industrial Perspective


DR. S.T. LONKAR
Envocare Research & Eng. Pvt Ltd.,Pune
Environmental Pollution, Monitoring, and Analysis


DR. SUJEETH NEERAKKAL
Ireland
A sustainable innovation designed to enhance crop resilience in response to climate change


DR. CRISTINA B. LLAMERO
Spain
To be announced soon


DR. J.R. KUMAR
JSS AHER, Mysuru
Unveiling the Functional Mechanisms of Russell's Viper Snake Venom Phospholipase $A_2$


DR. SHIVARAJU H.P
JSS AHER, Mysuru
Sustainable Solutions: Addressing Antimicrobial Resistance and Environmental Health Challenges

**INTERNATIONAL CONFERENCE on RECENT DISCOVERIES AND INNOVATIONS IN LIFE SCIENCES**
**Sep 18,19 2025**

This Conference is organized by the Life Sciences Departments of B.P. Hivale Education Society's Ahmednagar College, in collaboration with former students from The John Barnabas Post-Graduate School for Biological Sciences, and is pioneering landmark event in the field of Life Sciences. Scheduled to take place on September 18-19th this conference will bring together leading scientists, researchers, teachers, and industry professionals from India, USA, Italy and other countries to explore innovations shaping the future of Life Sciences.
The conference is designed to showcase the breadth of potential opportunities in the Life Sciences to students, teachers, researchers. We are working with both academics and industry leaders to highlight opportunities in academic research & in Industry.

**Global Participation**
The Conference has **350+ registrations** across various categories, including physical participation (oral and poster presentations), online presentations, and online form most states in India and other countries like USA, Italy,

**REGISTRATION FORM WITHOUT ABSTRACT**
**https://forms.gle/ZCcJfTwYztUtJTit5**
**Contact: Dr. Ivan Aranha,** Organizing Secretary, Mobile : + 91 98457 00052
Email:international.conference.2025@aca.edu.in

**Available on Ahmednagar College YouTube Channel**